# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.

डॉ. संजयकुमार दळवी
एम्.एस्सी., पीएच्.डी.
प्र. कार्यक्रम समन्वयक

कार्यालय क्र. : ०२०-२५६९७३४१
०२०-२५६०११९३
०२०-२५६०११६०
फॅक्स क्र. : ०२०-२५६९७३४१


संदर्भ : रासेयो/१७६/१४ दि. २९/०९/२०१४

**प्रति,**
**मा. प्राचार्य/मा. संचालक**
**सर्व संलग्नीत महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्था**
**रासेयो संलग्नीत महाविद्यालये**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**
**पुणे-४११ ००७.**

**विषय : स्वीप-२ (SVEEP-II) कार्यक्रमांच्या व शपथग्रहणाच्या अंमलबजावणी बाबत.**
**संदर्भ :** स्वीप-२-जनलर/२०१४, दि. २४/०९/२०१४
**महोदय,**

जिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे यांनी पाठविलेल्या वरील संदर्भीय पत्रानुसार भारतीय लोकशाही अधिक बळकट व्हावी यासाठी मतदारांना अधिक साक्षर व जागृत करण्याच्या उद्देशाने भारत निवडणूक आयोगाने स्वीप-२(**SVEEP-II**) (**Systematic Voter's Educatoin & Electoral Participation**) हा महत्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेतला आहे. लोकसभा निवडणूकीचे वेळी मतदारांची मोठ्या प्रमाणावर नोंदणी होऊन विक्रमी मतदान झाले आहे. तेव्हा आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०१४ करीता देखील आपण या कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी कराल याबाबत विश्वास आहे.

आपणांस कळविण्यात येते की स्वीप-२(**SVEEP-II**) या कार्यक्रमा अंतर्गत पुणे जिल्ह्यात विविध ठिकाणी मतदार जनजागृतीचे काम चालू आहे. आपण आपल्या महाविद्यालयाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांमार्फत मार्फत पथनाट्य, रॅली, वक्तृत्व स्पर्धा, सायकल रॅली, मतदार शपथ व इतर कार्यक्रमांचे आयोजन मोठ्या प्रमाणावर करुन मतदारांमध्ये जनजागृती करण्यात यावी.

तसेच दि. **२ ऑक्टोबर २०१४** रोजी **'महात्मा गांधी जयंती निमीत्त'** स्वच्छता अभियान शपथ ग्रहण कार्यक्रमा सोबत **'मतदार शपथ'** आपल्या महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांसोबत घेण्यात यावी.

सदर कार्यक्रमाचा खर्च राष्ट्रीय सेवा योजना नियमित कार्यक्रमातून करण्यात यावा व सदर कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर दि. ५ ऑक्टोबर २०१४ पर्यंत अहवाल nss@unipune.ac.in, nssrcpune@gmail.com, sveeppune@gmail.com व dyc.pune@gmail.com या मेल आयडीवर पाठवण्यात यावा, ही विनंती.

कळावे, धन्यवाद !

***सोबत** : १. शपथ ग्रहण कार्यक्रमात घ्यावयाची शपथ*

29/9

**प्र. कार्यक्रम समन्वयक**
**राष्ट्रीय सेवा योजना**

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
# राष्ट्रीय सेवा योजना

## मतदारांसाठी प्रतिज्ञा

आम्ही, भारताचे नागरिक,
लोकशाहीवर निष्ठा ठेवून,
याद्वारे, प्रतिज्ञा करतो की,
आपल्या देशाच्या लोकशाही
परंपरांचे जतन करु आणि मुक्त
नि:पक्षपाती व शांततापूर्ण
वातावरणातील निवडणुकांचे
पावित्र्य राखू व प्रत्येक
निवडणुकीत निर्भयपणे तसेच धर्म,
वंश, जात, समाज, भाषा यांच्या
विचारांच्या प्रभावाखाली न येता
किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी
न पडता मतदान करु.